# राष्ट्रीय आरोग्य अभियान
## Zilla Parishad, Satara

# योग प्रशिक्षक भरती

जिल्हा परिषद सातारा यांचे मार्फत ८४ प्राथमिक आरोग्य केंद्र व ०८ आयुष्मान आरोग्यमंदीर (आयुष) येथे कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपात योग प्रशिक्षक नेमावयाचे आहेत.
संपूर्ण जिल्हात एकूण ९२ योग प्रशिक्षकांची पदे ३१ मार्च २०२५ पर्यंत मंजुर आहेत.
प्रा.आ.केंद्र स्तरावर व त्याअंतर्गत समुदाय आरोग्य अधिकारी असणाऱ्या उपकेंद्रांवर योग प्रशिक्षकांना प्रति योग शिबिराकरिता रु.५००/- मानधन अदा केले जाणार आहे व
आयुष आरोग्यवर्धिनी केंद्र स्तरावर प्रति योगशिबिराकरीता रु.२५०/- मानधन मंजुर आहे.

योग प्रशिक्षकाकरिता अर्ज करण्याची अंतिम दिनांक :- २३-०८-२०२४

अर्जाचा नमुना प्राप्त करुन घेणेसाठी व जाहिरातीसंबंधी सविस्तर माहिती जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या संकेत स्थळावर वर उपलब्ध आहे.
**अर्ज करणेसाठी भरती शुल्क रक्कम रु.५००/- ऑनलाईन पध्दतीने खालील खात्यावर भरणे बंधनकारक आहे.**

भरती शुल्क भरणेसाठीचा तपशिल Bank of Maharashtra, Shivaji Circle, Powai Naka, Satara

Account Number – 60402928399 (District Integrated Health & Family Welfare Society, Satara )

| | |
|---|---|
| Sign<br>District Account Manager,<br>Zilla Parishad, Satara | Sign<br>District Health Officer,<br>Zilla Parishad, Satara |

# योग प्रशिक्षकासाठी सुचना

१. योग प्रशिक्षक म्हणून निवड करताना प्रकल्प कृती आराखडा सन २०२४-२५ च्या अन्वये ३१ मार्च २०२५ पर्यंत कंत्राटी नियुक्ती आदेश प्रात्र उमेदवारांना देण्यात येतील.

२. उमेदवारांनी जिल्हा कार्यालयास आपला अर्ज (हार्ड कॉपी), आवश्यक योग संबंधी कागदपत्रे व भरती प्रक्रिया शुल्काची पावती सादर करावयाची आहे. तसेच अर्ज कार्यालयाकडे सादर करणेपुर्वी आवश्यक माहिती **https://forms.gle/c1JcZ3sRHsT4rDXh9** या लिंकवर भरणे अनिवार्य आहे.

३. विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी प्रक्रिया करुन उमेदवारांची तात्पुरती पात्र/अपात्र यादी सुचनांसह जिल्हा परिषद सातारा यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

४. त्यानंतर तात्पुरती पात्र/अपात्र यादीतील शेऱ्यानुसार उमेदवारांना कागदपत्रे पुर्तता करणेसाठी कालावधी देण्यात येईल. तदनंतर अंतिम पात्र/अपात्र यादी प्रसिध्द करण्यात येईल.

५. अंतिम पात्र उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल त्यावेळी प्राप्त गुणांनुसार हरकतीसाठी कालावधी देण्यात येईल. त्यानंतर प्राप्त हरकतींचा विचार करुन तारतम्याने अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. अंतिम गुणवत्ता यादीनुसार समुपदेशनाने कंत्राटी नियुक्ती आदेश देण्याची प्रक्रिया राबविणेत येईल.

६. उमेदवारांनी जिल्हा परिषद सातारा आरोग्य विभागामार्फत प्रसिध्द होणाऱ्या भरती प्रक्रियेसंदर्भातील सुचनांचे जिल्हा परिषद सातारा www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी अवलोकन करावे व इतर कोणत्याही बाबीचे जिल्हा कार्यालयास प्रत्यक्ष/दुरध्वनीद्वारे माहिती मागवू नये.

- **योग प्रशिक्षकांनी मुलाखत / प्रात्याक्षिक दरम्यान भरलेला फॉर्मची एक प्रत व योगप्रशिक्षणासंबंधी मुळ कागदपत्रे** (Degree, Diploma, Certificate Course, Govt. Experience Certificate) **प्रत्यक्ष सादर करावयाची आहे. मुळ कागदपत्रे सादर न केल्यास भरती प्रक्रियेतुन आपणास कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्यात येईल.**
- **अनुभव प्रमाणपत्र संस्थेच्या लेटर हेडवर, जा.क्र., तारीख, स्पष्ट अनुभवाचा कालावधी, संस्था प्रमुखाची स्वाक्षरी व शिक्का असणे गरजेचे आहे, अन्यथा अनुभवाचे गुण देण्यात येणार नाहीत.**
- भरती प्रक्रियेमध्ये पुढील प्रमाणे गुणानुक्रमे (Merit) ठरविले जाईल.

(Degree→ Diploma →Certificate Course + Govt.Experience Certificate) या प्रमाणे ठरविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ | योग पदवी असल्यास | १० गुण |
| ब | योग डिप्लोमा असल्यास | ६ गुण |
| क | सर्टिफिकेट कोर्स असल्यास | ४ गुण |
| ड | शासकीय संस्थेतील प्रत्येक ६ महिन्यांसाठी १ गुण असे अधिकतम१०गुण | १०गुण |
| | **एकूण गुण** | **३० गुण** |

- जाहिरातीनुसार रिक्त असलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्राकरीता (PHC+Ayush Disp.) व अंतिम यादीनुसार उमेदवारांना मेरिटप्रमाणे समुपदेशना करिता बोलविले जाईल. समुपदेशनामध्ये गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना रिक्त असणाऱ्या ठिकाणी नियुक्ती आदेश देणेत येतील. जे उमेदवार नियुक्तीसाठी इच्छुक नसतील त्यांचा नकार गृहीत धरुन तात्काळ त्याच दिवशी नकारपत्र भरुन देणे अनिवार्य राहील. त्यामुळे उमेदवारांने विचारांती निर्णय घ्यावा. तसेच समुपदेशनासाठी अनुपस्थित असणाऱ्या पात्र उमेदवारांना गरजेनुसार कार्यालयामार्फत नियुक्ती प्रस्तावित करण्यात येईल.

- समुपदेशनपश्चात देणेत आलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्रानुसार कंत्राटी नियुक्ती आदेश ई मेल किंवा जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर किंवा प्रत्यक्ष देणेत येतील.
- अंतिम वर्षाचे गुण CGPA नुसार असल्यास अर्जावर CGPA नुसार अंतिम वर्षाची टक्केवारी मोजण्याचा Formula नमुद करावा.
- मेरीट यादीत एखाद्या उमेदवाराचे समगुण झाल्यास खालीलप्रमाणे मेरीट प्राध्यान्यक्रमाचे निकष राहतील. तदनंतरच अंतिम यादी प्रसिध्द करणेत येईल.
  १) पदवीच्या (Degree) अंतिम वर्षाचे गुण
  २) पदवीका (Diploma) अंतिम वर्षाचे गुण
  ३) जन्मतारीख (वयोजेष्ठतेनुसार प्राधान्य)
- कंत्राटी नियुक्ती आदेश निर्गमित झालेनंतर कोणत्याही प्रकारे नियुक्तीचे ठिकाण बदलुन दिले जाणार नाही. त्यामुळे समुपदेशनाने नियुक्ती दिल्यानंतर नियुक्ती ठिकाण बदलणेसाठी या कार्यालयास पत्र व्यवहार /विनंती अर्ज /पदाधिकारी यांचेमार्फत शिफारस करु नये.
- नियुक्ती आदेशापश्चात ०७ दिवसाच्या आत दिलेल्या नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणेचे आहे व तसा हजर अहवाल तालुका कार्यालयामार्फत जिल्हा कार्यालयास ई मेलव्दारे पाठविणेचा आहे.
- आपण नियुक्ती आदेशानुसार दिलेल्या ठिकाणी विहित मुदतीत हजर न झाल्यास आपण सदर पदावर काम करण्यास इच्छुक नसून आपली जिल्हा कार्यालयाकडे या बाबतची कोणतीही भविष्यात तक्रार असणार नाही व नियमाप्रमाणे प्रतिक्षा यादी मधील असणाऱ्या उमेदवारांना पुढील नियुक्ती आदेश दिले जातील.
- योग प्रशिक्षकाला प्रत्येक आठवड्यात कार्यरत आरोग्यवर्धीनी केंद्रामध्ये (प्रा.आ.केंद्र, उपकेंद्र-समुदाय आरोग्य अधिकारी कार्यरत असणाऱ्या ठिकाणी) <u>एक शिबीर किमान २० लाभार्थ्यांच्या उपस्थितीत</u> आयोजित करावयाचे आहे.
- एकाच दिवशी ०२ पेक्षा जास्त शिबीरे आरोग्यवर्धीनी केंद्रावर आयोजित करता येणार नाही, तसे केल्यास अतिरिक्त शिबीराचे मानधन अदा केले जाणार नाही.
- प्रत्येक शिबिरामागे कार्यरत आरोग्यवर्धिनी केंद्रासाठी (समुदाय आरोग्य अधिकारी कार्यरत असणाऱ्या ठिकाणी) प्रत्येक योग शिक्षकाला रु.५००/- मानधन प्रा.आ.केंद्र स्तरावरुन शिबिरांच्या संख्येनुसार व दरमहाच्या परिपुर्ण कागदपत्रांच्या आधारे दिले जाणार आहे.
- आयुष्मान आरोग्यमंदीर (आयुष) चोरे, ता. कराड, भाडळे, ता. कोरेगाव, निंबळक, गुणवरे व आदर्की, ता. फलटण, इंजबाव ता. माण, म्हासुर्णे ता. खटाव, व जांभुळवाडी ता. पाटण या ०८ संस्थांसाठी महिन्याभरात कमीत कमी १ तासाचे ३२ योगसत्र (२० योगसत्र आरोग्य संस्थेमध्ये व उर्वरीत १२ कार्यक्षेत्रामध्ये) घ्यावयाची आहेत. त्यांना रु.२५०/- प्रति तास प्रमाणे ३२ सत्रांचे रु.८०००/- प्रति माह मानधन देय आहे.
- <u>ज्या योगशिक्षकांचे वार्षिक मानधन रु.३००००/- पेक्षा जास्त होणार आहे अशा सर्व योगशिक्षकांचे राज्य कार्यालयाच्या पत्रानुसार कलम **Tax Compliance Calender मधील Section 194-J अंतर्गत आपल्या सेवा येत असल्याने 10 % TDS कपात करण्यात येईल. त्यामुळे भविष्यात या कार्यालयाकडे TDS कपातीविषयी कोणतीही विचारणा करण्यात येऊ नये.**</u>

| | |
|---|---|
| जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक<br>जिल्हा परिषद सातारा | जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद सातारा |

अर्जाचा नमुना

योग प्रशिक्षक पदासाठी अर्ज

संदर्भ:- -०८-२०२४ रोजीची जाहिरात

Photo

**प्रति,**

मा. जिल्हा आरोग्य अधिकारी,

जिल्हा परिषद सातारा.

**संपुर्ण नाव** **मराठीमध्ये** **English (Capital Letter)**

१) आडनाव ............................................................ ............................................................

२) स्वत:चे नाव ............................................................ ............................................................

३) वडीलांचे / पतीचे नाव ......................................................... ..........................................................

४) आईचे नाव ............................................................ ............................................................

**पत्रव्यवहारचा संपुर्ण पत्ता पिनकोडसहीत**

..................................................................................................................................................................

..........................................................................................................................................................

**दुरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक** .....................................................ईमेल आयडी........................................................

**जन्मतारीख :-** / / दि.१०-०८-२०२४ रोजीचे वय :-..............वर्षे ........... महिने

**५) शैक्षणिक अर्हता**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्षे | अंतिम वर्षाची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १० वी किंवा १२ वी | | | | |
| २ | Diploma in Yoga | | | | |
| ३ | Degree in Yoga | | | | |
| ४ | Certificate Course in Yoga | | | | |
| ५ | Any Other Course related to Yoga | | | | |

६) अनुभव (केवळ शासकीय व निमशासकीय)

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्षे |
|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

(७) आपणांविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय?

| होय | नाही |
|---|---|
| | |

असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.

९) अर्जासोबत जोडलेल्या (छायांकीत) सत्यप्रतीचा तपशिल

| अ.क्र. | **कागदपत्रे छायांकीत प्रत** | **होय/नाही** |
|---|---|---|
| १ | १० वी किंवा १२ वी | |
| २ | Diploma in Yoga | |
| ३ | Degree in Yoga | |
| ४ | Certificate Course in Yoga | |
| ५ | Any Other Course related to Yoga | |
| ६ | Adhar Card/Pan Card/Voting Card/Driving License | |
| ७ | Online भरती शुल्क भरलेल्याची पावती | |
| ८ | महिलांसाठी नावात बदल असल्यास राजपत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र | |

१०) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? होय / नाही

मी असे प्रमाणित करतो/ करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे. जाहिरातीनुसार या पदाकरीता बिंदुनामावलीची अट नाही, वयाची अट नाही तसेच या पदाकरीता कंत्राटी नियुक्ती आदेशामध्ये नमुद नियम व भविष्यात जे जे नियम लागु होतील त्याचे पालन मी करेन. ३१ मार्च २०२५ पर्यत कंत्राटी नियुक्ती आदेश मिळाल्यास माझी हरकत नसुन कोणत्याही प्रकारे मी सरळसेवामध्ये समाविष्ट करण्यासाठी आग्रही राहणार नाही याची हमी देतो/ देते.

११) अर्ज सादर करणेपुर्वी जाहिरातीनुसार व पुर्ण सुचना वाचलेनंतर गुगल लिंकमध्ये माहिती भरली **होय / नाही**

सही /-

नाव ....................................................